संयुक्त प्रसिद्धीपत्रक: भारत-युरोपियन संघ धोरणात्मक भागीदारीविषयक 7वी आढावा बैठक

भारत आणि युरोपियन संघ यांनी 09 नोव्हेंबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे 7वी भारत-युरोपियन संघ धोरणात्मक भागीदारी आढावा बैठक (एसपीआरएम) आयोजित केली होती. या बैठकीचे सह-अध्यक्षपद परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) श्री सिबी जॉर्ज आणि युरोपियन एक्सटर्नल ॲक्शन सर्व्हिसचे भू-अर्थशास्त्र व आंतरसंस्थात्मक घडामोडींचे उपसरचिटणीस श्री मॅट्टी मासीकास यांनी भूषवले.

2. उभय बाजूंनी भारत-युरोपियन संघ संबंधांमधील अत्यंत सकारात्मक गतीचे स्वागत केले आणि 27 जानेवारी 2026 रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या 16व्या भारत-युरोपियन संघ शिखर परिषदेत स्वीकारलेल्या संयुक्त सर्वसमावेशक धोरणात्मक कार्यसूचीच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.

3. उभय बाजूंनी व्यापार आणि गुंतवणूक सहकार्याला चालना देण्याच्या दिशेने केलेल्या कामाचा आढावा घेतला. ज्यामध्ये भारत-युरोपियन संघ मुक्त व्यापार करारावर वेळेवर स्वाक्षरी करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे, तसेच गुंतवणूक संरक्षण करार आणि भौगोलिक संकेतांवरील करार पूर्ण करण्याच्या दिशेने काम सुरू ठेवणे यांचा समावेश होता. या चर्चेत पुरवठा साखळी मजबूत करणे आणि आर्थिक सुरक्षा यावरही चर्चा झाली, ज्यामध्ये व्यापार आणि तंत्रज्ञान परिषद (टीटीसी) आणि ब्लू व्हॅलीज उपक्रमातील धोरणात्मक कामांचा समावेश होता.

4. उभय बाजूंनी स्वच्छ संक्रमणाला चालना देण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे नूतनीकरण केले, या संदर्भातील कार्यवाहीचा आढावा घेतला आणि युरोपियन संघाच्या जहाज पुनर्वापर नियमांचे पालन करणाऱ्या भारतीय जहाज पुनर्वापर केंद्रांचा त्यांच्या जहाज पुनर्वापर सुविधांच्या यादीत समावेश करण्यासाठी सहकार्य पुढे नेण्यावर भर दिला.

5. उभय बाजूंनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्वांटम तंत्रज्ञान, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (डीपीआय), प्रगत अर्धवाहक, स्वच्छ तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान यांसह महत्त्वपूर्ण व उदयोन्मुख तंत्रज्ञानावरील सहकार्याबाबत, तसेच अनुकूल डिजिटल परिसंस्थेला चालना देण्यासाठी आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांचा (डीपीआय) प्रसार करण्याबाबत चर्चा केली. होरायझन युरोप सोबत भारताच्या संभाव्य संबंधासह संशोधन सहकार्य अधिक दृढ होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

6. उभय बाजूंनी जागतिक गेटवे, भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (आयएमईसी) आणि स्वच्छ ऊर्जा, हवामान लवचिकता, हरित गमनशीलता आणि डिजिटलायझेशन या क्षेत्रांतील त्रिपक्षीय

प्रकल्पांवर दोन्ही पक्षांनी भर दिला. प्रभावी जागतिक प्रशासनाला आकार देण्यासाठी समन्वय आणि सहकार्य वाढविण्यावरही त्यांनी सहमती दर्शविली.

7. उभय बाजूंनी प्रतिभा गमनशीलता, शिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रांसह दोन राष्ट्रांतील नागरिकांचे परस्पर संपर्क वाढविण्यावर तसेच युरोपियन लीगल गेटवे कार्यालयाच्या संबंधित घडामोडींचा आढावा घेतला. ते भारत-EU मानवाधिकार संवादाच्या पुढील आवृत्तीसाठी देखील उत्सुक आहेत.

8. विश्वासार्ह, अपेक्षित आणि समान विचारसरणीचे भागीदार म्हणून, त्यांनी भारत-युरोपियन संघ धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याच्या आणि परस्पर फायदेशीर, ठोस व परिवर्तनकारी परिणाम साध्य करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या बैठकीत नेतृत्व स्तरावरील भविष्यातील बैठकीच्या तयारीचा आढावा घेण्याची संधी देखील उपलब्ध झाली. पुढील धोरणात्मक भागीदारी आढावा बैठक पुढील वर्षी ब्रुसेल्स येथे परस्पर सोयीच्या तारखेला आयोजित करण्याचे मान्य करण्यात आले.

नवी दिल्ली

09 नोव्हेंबर 2026